# मंत्रिपरिषद निर्णय

## २३ फेब्रुवारी २०१६

## ( बैठक क्र. ६९ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | प्रचलित खरेदी धोरणातही तरतूद करण्यात येणार<br>**घरपोच आहाराचा पुरवठा करण्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने निविदा मागविण्यास मान्यता** | महिला व बालविकास |
| २ | **महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास मान्यता** | महसूल |
| ३ | महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६०<br>**सुधारणांसह अध्यादेश काढण्यास मंत्रिपरिषदेची मान्यता** | सहकार |

प्रचलित खरेदी धोरणातही तरतूद करण्यात येणार

## घरपोच आहाराचा पुरवठा करण्यासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने निविदा मागविण्यास मान्यता

एकात्मिक बाल विकास सेवा योजना व सबला योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) पुरविण्यासाठी निविदा मागविताना दरासाठी स्पर्धात्मक निविदा (Commercial Bid) न मागविता केवळ Technical Bid द्वारे अभिव्यक्ती स्वारस्य (Expression Of Interest-EOI) पध्दतीने ई-निविदा मागविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिपरिषद बैठकीत घेण्यात आला.

या योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील सर्व बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता आणि ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार देण्यात येतो. त्याचप्रमाणे ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार देखील पुरविण्यात येतो. प्रामुख्याने अंगणवाड्यांना पुरविण्यात येणारा आहार कंत्राटदाराकडून न घेता स्वयंसहायता महिला बचतगट, महिला मंडळ आणि ग्राम समुदाय यांच्याकडून घेण्याचे शासनाचे आदेश आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना व सबला योजनेंतर्गत पोषण आहाराची गुणवत्ता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. तसेच यासंदर्भात केंद्र शासनाने ठरवून दिलेली मानके व किंमतीची मर्यादा पाळणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने पोषण आहाराचे दर निश्चित केलेले असल्याने किंमतीवर स्पर्धा करण्याची आवश्यकता नव्हती. तसे केल्यास काम मिळवून घेण्यासाठी कमी किमतीचा देकार देण्याचा कल राहील. कमी किमतीचा देकार दिल्यास गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो आणि पुरवठादार गुणवत्ता व प्रमाण टिकवू शकणार नाही.

त्याचप्रमाणे उद्योग विभागाने जाहीर केलेल्या खरेदी धोरणामध्ये अभिव्यक्ती स्वारस्य (Expression Of Interest-EOI) पद्धतीने ई-निविदा मागविण्याची तरतूद नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) पुरविण्याकरीता निविदा मागविताना दरासाठी स्पर्धात्मक निविदा (Commercial Bid) न मागविता केवळ Technical Bid व्दारे अभिव्यक्ती स्वारस्य (Expression Of Interest-EOI) पद्धतीने ई-निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच या पद्धतीनुसार निविदा प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यात येणार आहे.

गरम आणि ताजा आहारासाठी देखील याप्रकारची अडचण येणार असल्याने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत तसेच आवश्यक तेथे सबला योजनेंतर्गत निविदा मागविताना अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने ई-निविदा मागविण्यासाठी प्रचलित खरेदी धोरणात तरतूद करण्यात येणार आहे.

-----o-----

महसूल विभाग

## महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास मान्यता

विविध प्रकारच्या दस्तांवर आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क आता फ्रॅंकिंग तसेच ई-पेमेंटद्वारे ग्रास प्रणालीमार्फत आवश्यक तेवढचे भरण्याची सोय उपलब्ध असल्याने आता नागरिकांना योग्य तेवढेच मुद्रांक शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ७० चे पोटकलम २ वगळण्यास आजच्या मंत्रिपरिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची एक मधील अनुच्छेद-१ मधील खंड १ च्या उपखंड (ड) नुसार अभिस्विकृती (Acknowledgement) या दस्तावर आकारणी करण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काचे दर ठरविण्यात आले आहेत. त्यामध्ये सुधारणा करण्यात येऊन १० लाख रकमेपर्यंतच्या अभिस्विकृतीच्या दस्तावर ५० रुपये व १० लाख रुपये व त्यावरील रकमेपर्यंतच्या अभिस्विकृतीच्या दस्तावर १०० रुपये इतक्या मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

सहकार विभाग

महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६०

## सुधारणांसह अध्यादेश काढण्यास मंत्रिपरिषदेची मान्यता

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश १ डिसेंबर २०१५ रोजी राज्य शासनाने काढला होता. याबाबतचे विधेयक मागे घेऊन काही सुधारणांसह हा अध्यादेश पुन्हा काढण्यास राज्यपालांना विनंती करण्याच्या प्रस्तावास आजच्या मंत्रिपरिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिपरिषदेने मान्य केलेल्या सुधारणेनुसार शासनाचे भागभाडंवल असलेल्या सहकारी संस्थांमध्ये शासनाने नामनिर्देशीत केलेले दोन प्रतिनिधी असतील. त्यातील एक प्रतिनिधी सहाय्यक निबंधक या पदापेक्षा कमी दर्जाचा नसेल, तर दुसरा प्रतिनिधी संस्थेच्या कामकाजाबाबत अनुभव असणारा व विहित पात्रता धारण करणारा असेल. या प्रतिनिधींकडून संबंधित संस्थेच्या कामकाजात अधिकाधिक सुधारणा आणि कार्यक्षमतावाढीसाठी योगदान अपेक्षित आहे.

अकरा संचालक असणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये एक कर्मचारी प्रतिनिधी आणि सतरा सदस्यीय संचालक मंडळात दोन कर्मचारी सदस्य असतील. संबंधित कायद्याच्या कलम २ (१४-अ) आणि कलम ७३-अअअ मध्ये असलेल्या तरतुदीमध्ये हे बदल केले जातील. ज्या सहकारी संस्थेत २५ अथवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी वेतनावर कार्यरत असतील, त्यातील कोणत्या संस्थांना संबंधित तुरतुदीतून सूट द्यायची हे वेळोवेळी आदेश काढून ठरविले जाणार आहे. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर कर्मचाऱ्यांना प्रतिनिधित्व मिळण्यासाठी शासनाने वरील बदल केलेले आहेत.

-----०-----